लोकमत

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्र व्यापले आहे. तुमची इच्छा असो अथवा नसो, तुम्हाला येवो अथवा न येवो, डिजिटल डिव्हाइसेसमधून एआयने तुमच्या जीवनात प्रवेश केलेला आहे. ज्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेले अगदी त्याप्रमाणे अन् त्याच्या कित्येक पटींनी एआय आपले आयुष्य व्यापून टाकते आहे. अशा वेळी 'एआय'ने निर्माण केलेली आव्हाने स्वीकारून त्याचे संधीत रूपांतर करणे हेच करिअरचे यशस्वी मंत्र असणार आहे.

करिअर

# 'एआय' : आव्हाने अन् संधीही!



**प्रिया काळे,**
सहायक प्राध्यापक



एआय तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रांतील रोजगार खाऊन टाकले आहेत. वेळीच हे तंत्रज्ञान आत्मसात करून स्वत:ला उन्नत केले नाही तर शिक्षणक्षेत्रामध्ये देखील शिक्षकांची गरजच राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता खरंच शिक्षकांच्या नोकऱ्या काढून घेऊ शकते का? किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता हे शिक्षकांना लाभलेलं वरदान आहे का? असे प्रश्न सतावत राहतील. कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षणक्षेत्रातील वावर पाहता काहीच दिवसांत शिक्षणक्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडून येईल, यात शंका नाही. मुख्य म्हणजे आधुनिक पिढी अगदी सहजपणे याचा वापर करत असली तरी तुलनेने जुन्या पिढ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शिकून घेणे तितकेसे सोपे नाही. त्यामुळे सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता काय काय करू शकते आणि त्याच्या साहाय्याने शिक्षकांना व त्यासोबतच शाळ व विद्यार्थ्यांना काय लाभ होणार आहेत, याची चर्चा करणे महत्त्वाचे ठरते.

कृत्रिम बुद्धिमत्ता वरदान ठरण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्वी शिक्षकांना करावी लागणारी तांत्रिक-कार्यालयीन कामे वेळखाऊ आणि रटाळ असत. विद्यार्थ्यांसाठी नोटीस तयार करणे, पत्रे तयार करणे, कार्यक्रम पत्रिका तयार करणे, त्याचे अहवाल लिहिणे, विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवणे यांसारखी कामे 'एआय'च्या साहाय्याने काही सेकंदांत होऊ शकतात. याव्यतिरिक्त शाळेचे वार्षिक अहवाल तयार करणे, रोजच्या पाठांचे पाठ टाचण तयार करणे, विविध स्पर्धांचे अहवाल तयार करणे, शाळा तपासणीसाठी अहवाल तयार करणे, वेगवेगळे अभिलेख, नोंदी, गुणपत्रिका यांसारखे दस्तऐवज शिक्षकांना करावे लागतात. ही वेळखाऊ कामे आता 'एआय'च्या मदतीने काही मिनिटांमध्ये होऊ शकते. नोटीस तयार करण्यापासून ते विशिष्ट उपक्रमाचा अहवाल करण्यापर्यंत 'एआय'ची मदत घेऊन शिक्षक हे काम पटकन संपवून बहुमूल्य वेळ अध्यापनकार्यासाठी देऊ शकतात.

'एआय'मध्ये सध्या अनेक ॲप्लिकेशन उपलब्ध आहेत. जी शिक्षकांची दैनंदिन अध्यापनाची आणि इतरही कामे चुटकीसरशी करू शकतात. यातील बहुसंख्य ॲप्लिकेशन मोफत उपलब्ध आहेत. काहींना अगदी किरकोळ रक्कम भरावी लागते. शालेय पातळीवर अशी ॲप्लिकेशन घेतल्यास शाळेच्या महत्त्वाच्या कामकाजाच्या नोंदी ठेवणे आणि अध्ययन अध्यापनाचे, तसेच इतर उपक्रमांच्या अहवालाच्या नोंदी ठेवणे सोपे होऊन जाते.

## करा असा वापर

ॲप वापरून पाठ टाचण तयार करणे. यासाठी मॅजिक स्कूल एआय, क्युरिपॉड, लेसन प्लॅन्स एआय, एज्युकेशन कोपायलट हे ॲप एआयनिर्मित प्लॅटफॉर्म्स आहेत.

**मूल्यांकन आणि मूल्यमापन करणे. शिक्षकांसाठी हे काम आव्हानात्मक ठरते. विद्यार्थ्यांचे कार्य तपासणे आणि त्याची नोंदणी ठेवून अभिप्राय बनवणे एआयमुळे खूप सोपे झाले आहे. यात कोर्सबॉक्स, एस्सेग्रेडर एआय, क्विझिज, प्रेपएआय, मिनी कोर्स जनरेटर आदी ॲपचा वापर करता येईल.**

शिक्षकांसाठी स्लाइड्सगो, ऑडिओ पेन, टेडीएआय, ग्रामरली, चॅटजीपीटी हे एआय आधारित सहायक मदतीस येतील.

## एआय शिक्षकांची जागा घेईल का?

**सर्वत्र क्षेत्राला** व्यापून टाकलेल्या एआय तंत्रज्ञानाबद्दल शिक्षण क्षेत्रातही चिंता वाढली आहे. एआय शिक्षकांची जागा घेईल का?, शिक्षकांची गरज नष्ट होईल का? शिक्षकांच्या नोकऱ्या जातील का? अशी एक भीतीयुक्त चर्चा सगळीकडे घडत आहे; पण याचे उत्तर अगदी ठामपणे नाही असेच येईल. कारण, एआय तंत्रज्ञान कितीही अत्यानुधिक झाले तरीही तो शिक्षकांना पर्याय नक्कीच नाही. याचे सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षकांची विद्यार्थ्यांशी असलेली बांधिलकी. एआयला कितीही प्रोग्रामिंग केले तरी हे आपुलकीचे नाते प्रस्थापित करता येणार नाही. शिक्षक केवळ शिकवण्यापुरताच मर्यादित न राहता तो एक प्रेरणेचे स्थान असतो. विद्यार्थ्यांचे निरीक्षण करणे, त्यांना प्रेरणा देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना शैक्षणिक आणि वैयक्तिक मार्गदर्शन करणे यांसारख्या अनेक जबाबदारीच्या भूमिका तो पार पाडत असतो.

**विद्यार्थ्यांशी संवाद** साधण्याचे कौशल्य त्यांच्याकडे असते. एआयचा वापर या बाबतीत मर्यादित स्वरूपात राहू शकेल. एआय सुजाणपणे वापरता येणारे शिक्षक ही या काळाची खरी गरज आहे. विद्यार्थ्यांना एआयच्या वापराबाबत मार्गदर्शन करणारे, त्यातील बऱ्या-वाईट गोष्टींचे भान आणून देणारे शिक्षक आजच्या घडीला महत्त्वाचे ठरतील. शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यात एआयचा वापर करून महत्त्वपूर्ण कामगिरी करणारे शिक्षकच या प्रवाहात टिकून राहू शकतील. तेव्हा एआय नाही, तर एआयचा वापर करता येणारे शिक्षक एआयचा वापर न करता येणाऱ्या शिक्षकांची जागा घेऊ शकतील.